# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता. जि. ठाणे ४०१ १०१

**जा. क्र मनपा/वैआअ/१६१२/२०२१-२२** **दि. ०६/०८/२०२१**

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे भरणेबाबत थेट मुलाखत (Walk in interview)**

## <u>जाहीर सुचना</u>

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ठोक मानधनावर खालील नमूद केल्या प्रमाणे रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे (Walk **in interview)** भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेची विनंती करण्यात येत आहे. संबंधित पदापुढे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतींसह दि. १२/०८/२०२१ व दि. १३/०८/२०२१ रोजी सकाळी ९.०० वा नगरभवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, ३ रा मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मांडली तलावाजवळ, भाईंदर (प) ता. जि. ठाणे ४०१ १०१ येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे. याबाबतची सविस्तर माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कोविड-१९ अंतर्गत सर्व सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१) पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी (Full Time Medical Officer) (पदसंख्या-०२) (ठोक मासिक मानधन रु. ६०,०००/-)

| तपशील | समांतर आरक्षण | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% | १००% |
| रिक्त पदे | सर्वसाधारण | - | - | ०१ | | | | - | ०१ | - | - | ०२ |
| | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |

२) परिचारीका (Staff Nurse) (पदसंख्या-०१) (ठोक मासिक मानधन शासन रु. २०,०००/-)

| तपशील | समांतर आरक्षण | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | सर्वसाधारण | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | - | ०३ |
| | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |

MahaNMK.com

३) पदनाम : प्रसविका (ANM) (ठोक मासिक मानधन शासन रु. १८,०००/-)

| तपशील | समांतर आरक्षण | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | सर्वसाधारण | - | - | ०१ | ०१ | - | - | ०१ | ०१ | - | - | ०४ |
| | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |

४) पदनाम : प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) (ठोक मासिक मानधन शासन रु. १७,०००/-)

| तपशील | समांतर आरक्षण | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०२ | - | - | ०५ |
| | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |

**विशेष सुचना –**

१. पदांच्या संख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

२. राखिव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. त्यामुळे सर्व प्रवर्गातील उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित रहावे.

३. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत शासनामार्फत देण्यात येणाऱ्या मानधनाव्यतीरिक्त महानगरपालिकेमार्फत कोणतेही मानधन देय राहणार नाही.

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ठोक मानधनावरील शैक्षणिक पात्रता/अर्हता -**

| अ क्र | संवर्ग | रिक्त पदे | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | मासिक एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १. | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी (Full Time Medical Officer) | ०२ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची (MBBS) पदवी, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य. | ७० वर्षांपर्यंत | रु. ६०,०००/- |
| २ | परिचारिका (Staff Nurse) | ०३ | १२ वी उत्तीर्ण, जनरल नर्सिंग व मिडवायफरी डिप्लोमा, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य | ६५ वर्षांपर्यंत | रु. २०,०००/- |

MahaNMK.com

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | प्रसविका (Auxillary Nurse Midwife) | ०४ | माध्यमिक शालांत परिक्षा (१० वी) उत्तीर्ण, मान्यात प्राप्त संस्थेचा ए.एन.एम. अभ्यासक्रम उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य | ६५ वर्षापर्यंत | रु. १८,०००/- |
| ४. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | ०५ | बी. एस. सी. तथा डि. एम. एल. टी. , अनुभव असल्यास प्राधान्य | ६५ वर्षापर्यंत | रु. १७,०००/- |

**<u>टिप –</u>** १. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

२. वय वर्षे ६० नंतरच्या उमेदवारांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**१. पदभरती गुणांकनाची विस्तृत कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील-**

१.१ जाहिरातीत नमूद आवश्यक अधिकारी यांची थेट मुलाखत (Walk in selection) पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल.

१.२ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे भरती करणेकरीता मा. आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडील मार्गदर्शक सूचनेनुसार मुलाखत घेऊन गुणांकनाची पध्दत अवलंबली जाईल.

| Sr. No. | Name of the Candidate | Education Qualification (Finay Year Marks) | Additional Qualification | Experience | Subject Knowledge (Oral) | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 80 Marks | 5 Marks | 5 Marks | 10 Marks | 100 Marks |
| 1. | | | | | | |

१.३ अनुभव- दोन वर्षापेक्षा कमी अनुभवाकरीता ०, दोन वर्ष अनुभव असल्यास ३ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण देण्यात येतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१.४ पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त १ गुण व पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त ०२ गुण देण्यात येतील.

१.५ निवड झालेले उमेदवार व प्रतिक्षा यादीमधील उमेदवार यांची यादी मुलाखत स्थळी तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर शक्यतो त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात येईल.

१.६ निवड यादी गुणानुक्रमे प्रसिध्द करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारा व्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.

१.७ प्रतिक्षा यादीची विधी ग्राहयता १ वर्षाची असेल. निवड झालेले उमेदवार रुजू न झाल्याने अथवा कार्यरत असलेले उमेदवार सोडून गेल्याने पुढील १ वर्षात कोणतेही पद रिक्त झाल्यास, सदर पद प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून भरण्यात येईल.

१.८ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. ३१ मे, २०२१ अन्वये आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना आरक्षण देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**२. अटी व शर्ती :-**

२.१ पात्र व इच्छुक उमदवारांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणा-या सूचनांनुसार दि. १२/०८/२०२१ व दि. १३/०८/२०२१ रोजी सकाळी ९.०० वा नगरभवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, ३ रा मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका,

MahaNMK.com

मांडली तलावाजवळ, भाईंदर (प) ता. जि. ठाणे ४०१ १०१ येथे मुलाखत घेण्यात येईल.

२.२ उमेदवाराने मूळ प्रमाणपत्राच्या स्वयम् साक्षांकित छायाप्रति सोबत आणाव्यात (जन्मतारीख, शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्र व मार्कशिट, अनुभव आणि शासन निर्णयानुसार जातीचा दाखला, पासपोर्ट साईज फोटो)

२.३ उमेदवाराने उपायुक्त (वैद्यकीय), मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या नावाने अर्ज सादर करावा. अर्जामध्ये संपूर्ण नाव पत्ता जन्मतारीख, जात, पोटजात, शैक्षणिक अर्हता पुर्वानुभव नमूद करावा. तसेच अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो जोडवा.

२.४ MBBS पदवी धारकांसाठी MMC व नोंदणी नूतनीकरण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच परिचारिका व प्रसविका उमेदवारांकडे महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक आहे.

२.५ नेमणुकी संदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.

२.६ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) दरम्यान सदरची पदे करारपध्दतीने अस्तित्वात राहतील. तसेच नेमणूक झालेल्या उमेदवारास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

२.७ पुनर्नियुक्ती झालेल्या उमेदवारांना ११ महिन्यांकरीता नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना Performance Report पाहून पुनर्नियुक्तीचे अधिकार उपायुक्त (वैद्यकीय) यांना राहतील.

२.८ उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.

२.९ जागांच्या संख्येत बदल व इतर काहीही बदल करण्याचे अधिकार मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

२.१० सदरची जाहिरात महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३. वयोमर्यादाः-

१.१ उमेदवाराचे वय जाहिरातीमधील थेट मुलाखतीच्या (Walk in Selection) दिवशीचे वय ग्राह्य धरण्यात येईल.

४. मुलाखतीचे स्थळ व वेळ

| अ क्र | संवर्ग | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी (Full Time Medical Officer) | दि. १२/०८/२०२१ | अर्ज स्विकारण्याची वेळ सकाळी ९.०० ते १२.०० राहिल. | नगरभवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, २ ला मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मांडली तलावाजवळ, भाईंदर (प) ता. जि. ठाणे ४०११०१. |
| २ | परिचारिका (Staff Nurse) | | | |
| ३. | प्रसविका (Auxillary Nurse Midwife) | दि. १३/०८/२०२१ | | |
| ४. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | | | |

**टिप –** दु. १२.०० वा पर्यंत अर्ज स्विकारल्यानंतर अर्ज छाननी अंती पात्र उमेदवारांचे मुलाखत घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. उमेदवार निवडण्याची पध्दत

५.१ मुलाखतीस येताना अर्जदाराने मूळ प्रमाणपत्रे आणावीत. तसेच अर्जासोबत खालील क्रमाने मूळ प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.

अ) शाळा सोडल्याचा दाखला.
ब) जातीचे प्रमाण पत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र (मागासवर्गीय असल्यास)
क) वैधता प्रमाणपत्र/नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवारासाठी)
ड) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, तांत्रिक अर्हतेची प्रमाणपत्रे
इ) अनुभवाचे प्रमाणपत्र.
उ) डोमिसाईल प्रमाणपत्र. (महाराष्ट्रात वास्तव्य).

MahaNMK.com

ऊ) अपंग उमेदवारांच्या बाबतीत अपंगत्वाचे प्रमाण किमान 40% असणे आवश्यक आहे. उमेदवाराने अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ज्ञाने/शासकीय सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५.२ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर येथे नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत आणावी.

५.३ सर्व पदांकरिता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५.४ तोंडी मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही.

५.५ फक्त याच जाहिरातीला अनुसन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे यापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत.

५.६ उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, पदनिहाय स्वतंत्र अर्ज वैयक्तिक माहितीसह (Bio-Data) व त्यासोबत शैक्षणिक पात्रता व इतर नमूद कागदपत्रे विहीत नमुन्यात जोडून सादर करणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेले/अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

५.७ उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

५.८ शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10 दि. 27 जून 2011 नुसार (I) परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(II) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(III) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

५.९ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Cast Validity Certificate) साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.१० जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.-1064/2011/16-ब, दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अथवा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करणेत येईल.

५.११ एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाब आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

५.१२ बिंदु नामावली नुसार राखीव प्रवर्गात अनुसरुन पदभरती जाहीरात दिल्यानंतर पुढील प्रक्रीयेद्वारे अपेक्षीत राखिव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

५.१३ राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातुन उमेदवारांची केलेली नियुक्ती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेली असल्याने संबंधित राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त झाल्यानंतर अशी नियुक्ती संपुष्टात येईल.

५.१४ राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातुन उमेदवाराची तात्पुरती ११ महिन्यासाठी नियुक्ती दिल्यानंतर त्या उमेदवाराच्या ११ महिन्याचा नियुक्ती कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी ३ महिने अगोदरपासुन बिंदु

MahaNMK.com

नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पुनश्च जाहिरात देवुन राखीव जागेवरील उमेदवार उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

५.१५ मात्र दुसऱ्या प्रयत्नात देखील संपुर्ण पदभरतीची रितसर प्रक्रिया राबवुन राखीव जागेवर त्या त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर वरील मुददा क्र.४.१४ नुसार राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातुन नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना पुढील ११ महिन्यासाठी तात्पुरत्या फेरनियुक्ती देण्यात येईल. पुढील प्रत्येक ११ महिन्याचे नियुक्तीसाठी उपरोक्त प्रक्रियेचा सातत्याने अवलंब करण्यात येईल.

५.१६ राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पदे ही कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येणार नाही. उमेदवारांनी फक्त जात प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत सादर करावी.

५.१७ पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.१८ सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअंक-1010/717/प्र.क्र.322/10/16अ, दि.26 ऑगस्ट 2010 पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुसऱ्या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्या समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

५.१९ महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग 82/2001 म.से.आ.2000/प्र.क्र.415/का-2, दि. 25/05/2001 मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.२० सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2010/12, दि.28/03/2005 व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दि.28/03/2005 नुसार हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबतच्या नमुन्यात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणाऱ्या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्रात अविवाहित असे लिहून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.२१ अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अ.ज./अ.जा. उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Creamy-Layer Certificate) प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

५.२२ शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र. 82/2001/मसेआ-2000/ प्र.क्र.415/का.2, दि.25/05/2001 अन्वये खुला, वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील महिला उमेदवारांना राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.२३ वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याचे जात व मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.२४ उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.२५ शासन निर्णय क्र. संकिर्ण-2007/पडताळणी/नवि-26, दि.21/11/2007 अन्वये निवड झालेल्या उमेदवाराचे चारित्र्य/पूर्व इतिहास याबाबत स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत पडताळणी करुन घेऊन त्याच्या विरुध्द कोणताही गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही अथवा गुन्हा सिध्द झालेला नाही, असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच उमेदवारास हजर करुन घेण्यात येईल.

५.२६ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल./शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

५.२७ एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दि.27/06/2008 मधील

MahaNMK.com

निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

५.२८ अंतिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

५.२९ निवड झालेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रतेची मूळ प्रमाणपत्रे संबंधित मंडळ/ विद्यापीठ/संस्था यांचे जवळ पाठवून सत्यता पडताळणी करण्यात येईल. त्यात खोटी आढळल्यास संबंधिताना नोकरीतून कमी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

५.३० निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल

५.३१ निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही, असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

६. **विशेष सूचना :-**

६.१ सेवायोजन कार्यालय, ठाणे/मुंबई, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, शहापुर, बोरीवली, मुंबई यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मूळ/साक्षांकित प्रतींसह/वैयक्तिक माहितीसह अर्ज घेऊन मुलाखतीस उपस्थित राहावे.

६.२ मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातून फसवणूक झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

६.३ सदर जाहिरात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६.४ सदर भरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांव्यतिरिक्त उर्वरीत सर्व कागदपत्रे फक्त तीन महिन्या पर्यंत महानगरपालिकेकडे उपलब्ध राहतील.

६/८

अध्यक्ष तथा उपायुक्त (वैद्यकीय)
राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान
मिरा भाईंदर महानगरपालिका

MahaNMK.com

# <u>अर्जाचा नमुना</u>

(पदाचे नांव :- ......................................................पदांचा सांकेतिक क्र. .................. )

प्रति,

मा. उपायुक्त (वैद्यकीय)

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)

ता. जि. ठाणे. :- 401 101.

(1) संपुर्ण नांव : मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

1. **आडनांव** : .......................................... ..........................................

2. **स्वत:चे नांव** : .......................................... ..........................................

3. **वडिलांचे/ पतीचे नांव** : .......................................... ..........................................

(2) **पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता** : ..........................................................................................

**(पिन कोडसहित)** ..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक** : ..........................................................................................

(3) **अ) जन्मतारीख** : **तारीख** **महिना** **वर्ष**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब)** मुलाखतीच्या **दिनांक रोजीचे वय** ..........................**वर्ष**..........................**महिने**............**दिवस**

(4) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

(5) **अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ?** : **होय/नाही**

(6) **जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓) अशी खुण करावी.**

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | खुला | ईएसबीसी | वि.मा.प्र.(अ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

(7) **जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वतःचा प्रवर्ग खालीलप्रमाणे लागू असलेल्या चौकटीमध्ये अशी खुण करावी.** ✓

| अ.जा. | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज (ब) | भ.ज(क) | भ.ज (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | खुला | ईएसबीसी | वि.मा.प्र. (अ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

(8) **शैक्षणिक अर्हता:**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |

(9) **अनुभव:**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(10) वरील पदासाठी (सांकेतांक क्र.----- अर्ज भरला असुन मी

| **अंशकालीन** | **महिला** | **माजी सैनिक** | **प्रकल्प ग्रस्त** | **भुकंप ग्रस्त** | **खेळाडू** | **इतर (समांतर आरक्षणा व्यतीरिक्त)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

उमेदवार या आरक्षणा अंतर्गत अर्ज स्विकारावा. (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी.)

(11) **अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी.)**

| **मराठी** | **हिंदी** | **इंग्रजी** | **अन्य** |
|---|---|---|---|
| | | | |

(12) **आपणाविध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ?**

| **होय** | **नाही** |
|---|---|
| | |

(13) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

**1)** ............................ **2)** ............................... **3)** .......................................

**4)** ............................. **5)** ............................... **6)** ........................................

**मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

ठिकाण :- अर्जदाराची सही/-

दिनांक :-

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील

प्रतिज्ञापनाचा

नमुना-अ

(नियम 4 पाहा)

**मी श्री./श्रीमती**................................................ **श्री**................................................ **यांचा/ यांची/ मुलगा/ मुलगी/ पत्नी, वय**.............. **वर्षे, राहणार**...................................................................... **याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,**

1) **मी**............................................................... **या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.**
2) **आज रोजी मला**.............. **इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी** 28 **मार्च**, 2005 **यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......आहे.** (**असल्यास जन्म दिनांक नमुद करावा**)
3) **हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक** 28 **मार्च**, 2006 **व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.**

**ठिकाण** :- **अर्जदाराची सही/-**

**दिनांक** :-